# मेट्रो-३ चा पहिला टप्पा मे अखेरपर्यंत होणार सुरू

मुंबई, (वा.) कुलाबा- वांद्रे- सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेचा पहिला टप्पा या मे अखेरपर्यंत सुरू होणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) १२ मार्च रोजी आरे ते वांद्रे कुर्ला कॉम्पलेक्स (बीकेसी) या मार्गावर एक चाचणी घेतली आहे. त्यामुळे मे महिन्याच्या अखेरपर्यंत मेट्रो-३ मार्गिका सुरू होऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहेत. आरे ते बीकेसी पहिल्या टप्प्यातील काम ९४.७ टक्के पूर्ण झाले असल्याची माहिती मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.



मुंबईकरांचा प्रवास वाहतुक कोंडीमुक्त व्हावा यासाठी प्रशासन प्रयत्न करत आहे. महामुंबईत मोठ्या प्रमाणात उड्डाणपुल आणि मेट्रोचे जाळे पसरवण्यात येत आहे. देशातील सर्वात लांब भूमिगत मेट्रो-३ प्रकल्पाचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे.

## मार्गिकेवर २६ स्थानके

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गिकेतील पहिले स्थानक कफ परेड तर शेवटचे स्थानक आरे असणार आहे. या मार्गिकेवर एकूण २६ स्थानके असणार आहेत. विशेष म्हणजे, या २ स्थानकांपैकी आरे हे एक स्थानक जमिनीवर आहे तर उर्वरीत सर्व स्थानके भूमिगत असणार आहेत. बीकेसी ते आरे असा पहिला टप्पा मे अखेरपर्यंत मुंबईकरांच्या सेवेत असणार आहे. बीकेसी ते आरे या पहिल्या टप्प्याची चाचणी यशस्वीरित्या पूर्ण झाली आहे.